**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४.**

# प रि प त्र क

**विषय :** शालेय वर्ष २०१२–१३ मध्ये इयत्ता ९ वी व इयत्ता ११ वी ची पाठ्यपुस्तके बदलणार असल्याने नोंदणीकृत पुस्तक विक्रेत्यांकडून पुस्तके परत घेण्याबाबत...

**संदर्भ :** या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक व–ड–६/१००८५, दिनांक १०.०३.२०११.

संदर्भाधिन परिपत्रकान्वये शालेय वर्ष २०१२–२०१३ मध्ये खालील पाठ्यपुस्तके बदलणार असल्याचे कळविले होते.

१. शालेय वर्ष २०१२–२०१३ इयत्ता ९ वी इतिहास, भूगोल, ना. शास्त्र, अर्थशास्त्र व आपले पर्यावरण.

२. शालेय वर्ष २०१२–२०१३ इयत्ता १२ वी भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व संख्याशास्त्र (कला व विज्ञान) भाग–१ व भाग–२.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक रामं/पापुअ/७०९१, दिनांक २८.११.२०११ अन्वये शालेय वर्ष २०१२–२०१३ पासून इयत्ता ९ वी व इयत्ता ११ वी ची पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. त्यानुसार इयत्ता ९ वी इतिहास, भूगोल, ना. शास्त्र, अर्थशास्त्र व आपले पर्यावरण वगळून सर्व पाठ्यपुस्तके, इयत्ता ११ वी भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व संख्याशास्त्र (कला व विज्ञान) भाग–१ व भाग–२, साहित्य भारती वगळून सर्व पाठ्यपुस्तके मंडळाचे अधिकृत पुस्तक विक्रते व शैक्षणिक संस्था यांचेकडून खालील अटी/शर्तीनुसार मंडळाच्या विभागीय भांडारात परत घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अ. परत घ्यावयाची पाठ्यपुस्तके ही माहे फेब्रुवारी २०१२ अखेरपर्यंत स्विकारण्यात येतील.

ब. परत घ्यावयाच्या पाठ्यपुस्तकांची निव्वळ रक्कम भांडारातून वाहतूक खर्चासह माहे १ एप्रिल २०१२ नंतर धनादेशाद्वारे खालीलप्रमाणे अदा करण्यात येईल.

क. परत केलेल्या अभ्यासक्रमातील विक्रीयोग्य पुस्तकांची निव्वळ रक्कम, पुस्तकांची दर्शनी किंमत वजा वटाव अशी परिगणित करण्यात येईल.

ड. नोंदणीकृत पुस्तक विक्रेत्यांनी भांडारात परत केलेल्या पुस्तकांच्या परतीच्या वाहतुक खर्चापोटी मंडाळाचे भांडार असलेल्या स्थानिक ठिकाणच्या नोंदणीकृत पुस्तक विक्रेत्यांना परत केलेल्या पुस्तकांच्या दर्शनी किंमतीच्या अर्धा टक्का व बाहेरगावच्या नोंदणीकृत पुस्तक विक्रेत्यांना परत केलेल्या पुस्तकांच्या दर्शनी किंमतीच्या एक टक्का याप्रमाणे परिगणित होणारी रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.

इ. जे पुस्तक विक्रेते मंडळाचे नोंदणीकृत पुस्तक विक्रेते नाहीत अशा पुस्तक विक्रेत्यांनी मंडळाच्या नोंदणीकृत पुस्तक विक्रेत्यांकडून सदरची पुस्तके खरेदी केल्याचे देयक/पावती भांडारास सादर केल्यास त्यांचेकडून वरील अटींनुसार पुस्तके भांडारात परत घेण्यात येतील.

कृपया उपरोक्त सुचनांनुसार पुस्तके दिनांक २९.०२.२०१२ पूर्वी मंडळाच्या भांडारात परत करून सहकार्य करावे, ही विनंती.

क्रमांक : व–ड–६/७७४८
दिनांक : २१.१२.२०११

(ए. डी. गायकवाड)
व्यवस्थापक, साठा व वितरण,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे ४.

प्रति,
................
................

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४.**

# प रि प त्र क

**विषय :** पाठ्यपुस्तके बदलाबाबतची माहिती अधिकृत पुस्तक विक्रेते, शैक्षणिक संस्था व सर्व संबंधीताना कळविण्याबाबत ...

अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–३२ यांचे पत्र क्रमांक एसएससी - २०१०/(१९५/१०)/उमाशि–२ दिनांक २८.०९.२०११ अन्वये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक राज्य आराखडा २०१० ला मान्यता दिलेली असून शालेय वर्ष २०१२–२०१३ पासून इयत्ता ९ वी व ११ वी व शालेय वर्ष २०१३–२०१४ पासून इयत्ता १० वी व १२ वीची पाठ्यपुस्तके बदलास मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त बाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक रा. मं/पापुअ/७०९१, दिनांक २८.११.२०११ अन्वये शालेय वर्ष २०१२–२०१३ पासून इयत्ता ९ वी व इयत्ता ११ वी आणि शालेय वर्ष २०१३–२०१४ पासून इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी ची पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

शालेय वर्ष २०१२–२०१३ मध्ये नव्याने प्रकाशित होणाऱ्या व प्रथम प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची माहिती खालील प्रमाणे –

## इयत्ता ९ वी

| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा |
|---|---|---|
| | *नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके* | |
| १ | कुमारभारती | नऊ भाषा |
| २ | वाचनपाठ | मराठी |
| ३ | लोकभारती | हिंदी |
| ४ | गुजराती प्रवेशिका (संयुक्त) | गुजराती |
| ५ | गुजराती प्रवेशिका (संपूर्ण) | गुजराती |
| ६ | तारूफे–ए–उर्दू | उर्दू |
| ७ | संस्कृत, तरङ्गिणी | मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती |
| ८ | पाली कुसुमावली | पाली |
| ९ | अर्धमागधी प्राकृत | अर्धमागधी |
| १० | नसीमुल अदाब | अरेबिक |
| ११ | बारगा ए फारशी | पर्शियन |
| १२ | आंतरभारती | मराठी |
| १३ | लोकवाणी | हिंदी |
| १४ | बाग ए उर्दू | उर्दू |
| १५ | संस्कृत तरङ्ग | मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती |
| १६ | इंग्लिश रिडर | इंग्रजी |
| १७ | सामान्य गणित भाग–१ | आठ भाषा |
| १८ | सामान्य गणित भाग–२ | आठ भाषा |
| १९ | इतिहास + राज्यशास्त्र | आठ भाषा |
| २० | भूगोल + अर्थशास्त्र | आठ भाषा |

*प्रथमच नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके*

| | | |
|---|---|---|
| २१ | जर्मन भाषा | जर्मन |
| २२ | फ्रेंच भाषा | फ्रेंच |
| २३ | माहिती संप्रेशन तंत्रज्ञान | मराठी, इंग्रजी |

**इयत्ता ११ वी**

| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा |
|---|---|---|
| | *नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके* | |
| १ | युवकभारती | नऊ भाषा |
| २ | संस्कृत सारिका | मराठी, इंग्रजी |
| ३ | पालि आलोको | पालि |
| ४ | अर्धमागधी | अर्धमागधी |
| ५ | शमीमुल अदाब | अरेबिक |
| ६ | गुलहाय फारसी | पर्शियन |
| ७ | पुस्तपालन व लेखाकर्म | मराठी, इंग्रजी |
| ८ | वाणिज्य संघटन व व्यवस्थापन | मराठी, इंग्रजी |
| ९ | चिटणिसाची कार्यपद्धती | मराठी, इंग्रजी |
| १० | सहकार | मराठी, इंग्रजी |
| ११ | गणित व संख्याशास्त्र (वाणिज्य) भाग– १ | इंग्रजी |
| १२ | गणित व संख्याशास्त्र (वाणिज्य) भाग– २ | इंग्रजी |
| १३ | पीक उत्पादन | इंग्रजी |
| १४ | पर्यावरण शिक्षण | मराठी, इंग्रजी |
| | *प्रथमच नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके* | |
| १५ | व्यावहारिक हिंदी | हिंदी |
| १६ | मराठी साहित्य | मराठी |
| १७ | गृहशास्त्र –अन्नशास्त्र | मराठी, इंग्रजी |
| १८ | गृहशास्त्र–गृहव्यवस्थापन | मराठी, इंग्रजी |
| १९ | माहिती तंत्रज्ञान–कला | इंग्रजी |
| २० | माहिती तंत्रज्ञान–वाणिज्य | इंग्रजी |
| २१ | माहिती तंत्रज्ञान–विज्ञान | इंग्रजी |
| २२ | पशुविज्ञान | इंग्रजी |
| २३ | इतिहास | मराठी, इंग्रजी |
| २४ | भूगोल | मराठी, इंग्रजी |
| २५ | भूशास्त्र | इंग्रजी |
| २६ | राज्यशास्त्र | मराठी, इंग्रजी |
| २७ | समाजशास्त्र | मराठी, इंग्रजी |

| | | |
|---|---|---|
| २८ | मानसशास्त्र | मराठी, इंग्रजी |
| २९ | शिक्षणशास्त्र | मराठी, इंग्रजी |
| ३० | तत्वज्ञान | मराठी, इंग्रजी |
| ३१ | तर्कशास्त्र | मराठी, इंग्रजी |
| ३२ | संरक्षणशास्त्र | मराठी, इंग्रजी |
| ३३ | अर्थशास्त्र | मराठी, इंग्रजी |
| ३४ | ॲक्युपेशनल ओरिएंटेशन<br>ग्रंथालय आणि माहितीशास्त्र | मराठी |

**इयत्ता १२ वी**

| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा |
|---|---|---|
| | ***नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके*** | |
| १ | भौतिकशास्त्र | इंग्रजी |
| २ | रसायनशास्त्र | इंग्रजी |
| ३ | जीवशास्त्र | इंग्रजी |
| ५ | गणित व संख्याशास्त्र<br>(कला व विज्ञान) भाग– १ | इंग्रजी |
| ६ | गणित आणि संख्याशास्त्र<br>(कला व विज्ञान) भाग– २ | इंग्रजी |

शालेय वर्ष २०१३–२०१४ मध्ये नव्याने प्रकाशित होणाऱ्या व प्रथम प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची माहिती खालीलप्रमाणे –

१. इयत्ता १० वी विज्ञान आणि तंत्रज्ञान, बीजगणित व भूमिती वगळून उर्वरित सर्व पाठ्यपुस्तके

२. इयत्ता १२ वी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित आणि संख्याशास्त्र भाग– १ व भाग– २ वगळून उर्वरित सर्व पाठ्यपुस्तके

उपरोक्त बदलाबाबत महाराष्ट्र राज्यातील सर्व अधिकृत पुस्तकविक्रेते, शैक्षणिक संस्था व इतर सर्व संबंधित यांनी नोंद घ्यावी. तसेच आपली गरज विचारात घेऊन पाठ्यपुस्तकांच्या सर्व भाषांची खरेदी करावी, जेणेकरून पुस्तकांचा अनावश्यक साठा शिल्लक राहणार नाही. सदर बाब आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. कृपया याची नोंद घ्यावी, ही विनंती.

क्रमांक : व–ड–६/७७४८
दिनांक : २१.१२.२०११

(ए. डी. गायकवाड)
व्यवस्थापक, साठा व वितरण,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे ४.

प्रति,
................
................